क्र.कोजिप/बांखा/लेखा/वशि-५/कामवाटप/२०२१
बांधकाम विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर.
दिनांक -: ०१/११/२०२१

प्रति,

**मा.अध्यक्षसो/मा.उपाध्यक्षसो/मा.सभापतीसो**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

**विषय-: मजूर सहकारी संस्था / सुशिक्षीत बेरोजगार अभियंता / सर्वसाधारण कंत्राटदार यांचे कामवाटप कामकाजा बाबत..**

संदर्भ-: १) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.ग्रासयो-२००७/प्र.क्र.१/यो-३/मंत्रालय मुंबई दिनांक ८ मे २००७.
२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.ग्रासयो-२०११/प्र.क्र.२६/यो-९/मंत्रालय मुंबई दिनांक ११ एप्रिल २०११.
३)ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शानिक्र. संकीर्ण-२०१६/प्रक्र-१४८ /यो-९ दि.२/१२/१६
४) ग्रामविकास विभागाकडील शानिक्र. निविदा-२१/प्रक्र-७८/बांधकाम-४ दि.२७/०५/२१
५) मा.अति.मु.का.अ. यांचेकडील मंजूर टिप्पणी दि.०१/११/२०२१

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भातील शासन निर्णयान्वये मजूर सहकारी संस्था / सुशिक्षीत बेरोजगार अभियंता / सर्वसाधारण मक्तेदार यांना काम वाटपासाठी कामवाटप समितीची रचना केली आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेकडील कामांचे वाटप कामवाटप समितीमार्फत करणेत येणार असून प्रशासकीय व तांत्रिक मान्यता झालेल्या बांधकामांच्या व विद्युतीकरणाच्या कामांचे वाटपाबाबतचे कामकाज जि.प. मुख्यालय, कागलकर हाऊस येथे करणेत येणार आहे. कोविड-१९ बाबत आवश्यक ती सर्व काळजी घेऊन मास्क,सॅनिटायजर,सोशल डिस्टंसिंगचे पालन करून कामकाज करणेत येईल. उपलब्ध कामांच्या मर्यादेनुसार व प्र.मा.आणी तां.मा. झालेल्या कामांचे वाटप होईल. वेळापत्रक व कार्यपध्दती खालीलप्रमाणे

| अ.नं. | मिटींग घ्यावयाच्या तालुक्यांचे नांव | सभेचे ठिकाण | दिनांक व वेळ | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | **करवीर,राधानगरी,भुदरगड,कागल,पन्हाळा,गगन बावडा** | **जि.प. मुख्यालय, कागलकर हाऊस** | **०९/११/२०२१ दुपारी १२.००** | |
| २ | **हातकणंगले, शिरोळ,चंदगड, आजरा, गडहिंग्लज, शाहूवाडी** | | **१०/११/२०२१ दुपारी १२.००** | |

१.सु.बे.अ./विदयुत-सु.बे.अ./म.स.सं./सर्वसाधारण या सर्व संवर्गातील कामांची यादी **सभेच्या दिवशी सकाळी ११.०० वाजता** नोटीस बोर्ड वरती प्रसिध्द करणेत येईल.

२.त्याच दिवशी सकाळी ११.३० वाजता कागलकर हाऊस सभागृह , १ला मजला जि.प. मुख्यालय येथे प्रथम मंजूर संस्थाना कामे वाटप होतील. दुपारी १२.०० वाजता सर्वसाधारण कंत्राटदारांना व दु.१.०० वाजता सु.ब.अ. यांना कामे वाटप होतील. आणि विद्युतीकरणाची कामे दुपारी २.०० वाजता वाटप करणेत येतील. कामांचे वाटप हे प्रथम येणाऱ्या मागणी अर्जास प्राधान्याक्रमाने केले जाईल. कृपया माहितीस्तव सादर.

**सदस्य सचिव**
**कामवाटप समिती तथा**
**कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि.प.कोल्हापूर**

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव -**

१. मा.अध्यक्ष,कोल्हापूर जिल्हा मजूर सहकारी संघ मर्या.कोल्हापूर
२. मा.जिल्हा उप निबंधक,कोल्हापूर
३. गट विकास अधिकारी/उप अभियंता बांधकाम उपविभाग पंचायत समिती सर्व ..
४. प्रकल्प शाखा / रेखा शाखा / विद्युत शाखा / इमारत उपविभाग (बांधकाम) जि.प. कोल्हापूर
५. कार्यकारी अभियंता (ग्रापापु) जिल्हा परिषद कोल्हापूर